# 'लिफी' आजपासून ऑनलाइन सुरू

लोणावळा : पाचव्या लोणावळा आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सवाला (लिफी) लोणावळ्यात शुक्रवारी सुरुवात झाली. करोनामुळे यंदा ऑनलाइन माध्यमातून महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ ते २९ नोव्हेंबर, ४ ते ६ डिसेंबर आणि ११ ते १३ डिसेंबर या कालावधीत महोत्सव होणार असून, रोज संध्याकाळी सहा वाजता सर्व चित्रपट रसिकांना ऑनलाइन चित्रपट पाहण्याची संधी मिळणार आहे.

महोत्सवाच्या एकूण कालावधीत नऊ हिंदी चित्रपट आणि विविध भाषांमधील चार ते पाच लघुपट दाखविले जाणार आहेत. चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनावेळी एन. एन. सिप्पी यांना आदरांजली वाहण्यात आली. महोत्सवाचे आयोजन माधव तोडी यांचे असून, संकल्पना व आखणी विवेक वासवानी यांची आहे. अनंत महादेवन, आनंद-मिलिंद, प्रवेश सिप्पी, दिव्य सोलगामा यासारख्या नामवंतांचा विविध सत्रांत सहभाग आहे. महोत्सवातील चित्रपट रसिकांना 'प्लेक्सिगो' मोबाइल ॲपवर पाहता येणार आहे. त्यासाठी www.onelink.to/Plexigo या लिंकचा वापर करता येईल.